कार्यालयीन उपस्थिती

वारंवार होणाऱ्या रेल्वेच्या गोंधळामुळे होणारा उशिर.

20160106104020050७

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक समय १०९५/प्र.क्र.१०६/९५/१८ [र. व का.]
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ डिसेंबर, १९९५

परिपत्रक

१. शासकीय कार्यालयात वक्तशीरपणा काटेकोरपणे पाळला जावा, याबाबतच्या सूचना दि. ३०/११/१९६० च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या असून, सदर सूचनांचा पुनरुच्चार शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय १०९२/प्र.क्र.५३/१८ [र. व का.], दिनांक ३१/१०/९२ अन्वये करण्यात आला आहे. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व शासकीय कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

२. दि. ३१/१०/९२ च्या परिपत्रकातील परि. ४ मध्ये, " मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत असेल तर अशावेळी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा उशिर क्षमापित करण्यात यावा. तथापि वाहतूकीतील बारीकसारीक विस्कळीतपणा लक्षात आल्यास उशिरा उपस्थितीसाठी हे कारण समाधानकारक समजण्यात येऊ नये. कारण शासनाने १० मिनिटांचा अवधी अशा कारणासाठीच "ग्रेस पिरीयड" म्हणून दिला आहे", अशा सूचना दिल्या आहेत.

३. सध्या वारंवार विस्कळीत होणाऱ्या रेल्वे वाहतूकीमुळे बऱ्याचदा कर्मचाऱ्यांना कार्यालयात येण्यास उशिर होतो व अशाप्रकारे तीन वेळा उशिर झाल्यास संबंधितांची १ नैमित्तीक रजा कापली जाते. यासंदर्भात शासनाकडे बऱ्याच तक्रारी आल्या आहेत. त्यावर विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, रेल्वे वाहतूक विस्कळीत असल्यामुळे जे कर्मचारी उशिरा येतील, त्यांची उशिरा उपस्थिती क्षमापित करण्यात यावी. तथापि असे करताना, रेल्वे गाड्या संबंधित दिवशी खरोखरच उशिराने धावत होत्या किंवा कसे याबाबत संबंधित विभागांनी खातरजमा करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[नि. मो. चौधरी]